
**माहे जून २०२४ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली  कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | रायगड | रॉकी (डॉबरमन) | १) पो.शि./२९८ व्ही. व्ही.पाटील | खोपोली पो.स्टे. गु.र.नं.१८७/२०२४ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दाखल असुन गुन्हयामध्ये घटनास्थळी पाहणी केली असता घराचे मागे गुन्हयात वापरण्यात आलेला दगड मिळुन आला त्या दगडाचा वास श्वान रॉकी यास दिला असता श्वान दगड जेथे मिळुन आला त्या ठिकाणावरुन घराच्या पाठीमागच्या बाजुने घटनास्थळावरुन उत्तरेस अंदाजे १०० ते १२० मीटर अंतरावर जावुन तेथे बसलेल्या मयताच्या पत्नीच्या अंगावर भुंकू लागला. तसेच श्वान रॉकी यांस २ ते ३ वेळा वास दिला असता श्वानाने वरील प्रमाणे मार्गदर्शन केले.<br><br>सदर महिलेकडे तपास केला असता गुन्हा उघडकीस आला. अशा प्रकारे श्वान रॉकी व त्याचे हस्तकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | सिंधुदुर्ग | रॅम्बो<br>(डॉबरमन) | १) पो.हवा./१०५४<br>एस.एस.देवळेकर<br>२) पो.हवा./४४५<br>ए.जी.वें गुर्लेकर | देवगड पो.स्टे. जि. सिंधुदुर्ग गु.र.नं. ००५५/२०२४ भा.द.वि. कलम ३८०, ४५७ हा गुन्हा दि.०६/०६/२०२४ रोजी २१:५४ वाजता दाखल असून सदर गुन्हयाचे तपासाकरीता घटनास्थळाची पाहणी केली असता घटनास्थळावर सिमेंटचा दरवाजा उचकटलेला दिसुन येत आहे. संशयीताने हाताळलेल्या लोखंडी कपाटाच्या चावीचा स्मेल देण्यास सांगीतलेवरुन श्वान रॅम्बो याला वरील वस्तुचा स्मेल दिला असता श्वान घरामधील बेडरुम मधील कपाटाचा स्मेल घेत मुख्य दरवाजातुन बाहेर पडुन १० मीटर पुढे उजवीकडे वळून पुढे सुमारे २ कि.मी. वाडा मुळबांदा येथे घराची वस्ती असलेल्या ठिकाणी येवुन थांबला असल्याने गुन्हयातील आरोपी निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचे ताब्यातून मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.<br><br>अशाप्रकारे सदर गुन्हयातील तपासात आरोपीचा शोध घेणेकामी श्वान पथकातील श्वान रॅम्बो व श्वान हस्तक यांनी महत्वाची उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३. | सिंधुदुर्ग | रॅम्बो (डॉबरमन) | १) पो.हवा./१०५४ एस.एस.देवळेकर<br>२) पो.हवा./४४५ ए.जी.वेंगुर्लेकर | कणकवली पोलीस स्टेशन गु.र.नं. ०१८६/२०२४ भा.द.वि. कलम ४५४, ४५७, ३८० मधील घटनास्थळी सामान विस्कटलेले दिसुन येत आहे. त्या घटनास्थळावर मिळुन आलेल्या व अज्ञात आरोपीने हाताळलेल्या प्लॅस्टीक पिशवीचा वास श्वान रॅम्बोस दिला असता श्वान रॅम्बो प्लॅस्टीकचा पिशवीचा वास घेत घराच्या मुख्य दरवाजाने बाहेर पडुन कंपाउंडच्या मुख्य गेटने बाहेर पडत सुमारे ५०० मीटर अंतर जात मुंबई ते गोवा जाणाऱ्या मुख्य हायवे वर आला. त्यानंतर कणकवलीच्या दिशेने गेला व परत मागे फिरत कणकवलीच्या दिशेने जात सर्व्हीस रोडने पुढे ओव्हर ब्रीजच्या खाली आला. पुढे रस्त्यालगत असलेल्या पेट्रोल पंपाच्या दिशेने गेला व परत मागे फिरत कणकवलीच्या दिशेने सर्व्हीस रोडने जात मुख्य हायवेवर जांभळगाव पेट्रोलपंप नजीक आला. सदर मुख्य रस्त्याच्या बाजुला असलेल्या एका मोटार सायकलचा वास घेवुन त्यावर उडी मारली व त्या ठिकाणी थांबला. तपासी अधिकारी कणकवली यांनी फिर्यादी यांना घटनास्थळावर बोलावुन सदर मोटार सायकल नंबर हिरो होंडा CD १०० MH ०७/M/६४३१ ही फिर्यादी यांची असल्याची खात्री केली.<br>अशाप्रकारे सदर गुन्हयातील तपासात वाहनाचा शोध घेणेकामी श्वान पथकातील श्वान रॅम्बो व श्वान हस्तक यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | गोंदीया | बॉब (डॉबरमन) | १) पो.ना./ १४०३ सादतकर<br>२) पो.कॉ./ २०३७ शिवणकर | गोंदीया ग्रामीण पोलीस स्टेशन गु.र.नं. २५१/२०२४ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि०५/०६/२०२४ रोजी ०१:४८ वाजता दाखल असून सदर गुन्हयामध्ये तपासकामी ताब्यात घेतलेल्या ०५ संशयीत इसमांना एका रांगेत उभे करून घटनास्थळी मिळून आलेल्या रक्ताने माखलेल्या लोखंडी हातोडीचा वास श्वान बॉब यास देवुन सोडले असता त्याने इसम नामे रामलाल राजाराम कांबळे, वय ४८ रा.तांडा ता.जि.गोंदीया याचेजवळ जावून बसून भुंकून इशारा दिला.<br><br>सदर इसमाकडे तपास केला असता गुन्हा उघडकीस आलेला आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | गोंदिया | लुसी (जर्मन शेफर्ड) | १) पो.हवा./३९३ विजय बी. ठाकरे<br>२) पो.शि./१६३४ उमेश मारवाडे | जी.आर.पी. पो.स्टे. जिल्हा गोंदिया गु.र.नं. ११३/२०२४ NDPS ACT ८ (C), २० (B) (ii) विशाखा पट्टणम जीआरपी टीमसह रेल्वे स्टेशन मध्ये प्लॅटफार्म क्रमांक ०३ जवळ एक काळया रंगाची ट्रॅव्हलींग बॅग संशयितरित्या आढळून आल्याने अंमली पदार्थ शोधक श्वान - लुसी हिस घटनास्थळी बोलावुन श्वान हस्तकाने आदेश दिला असता तिने बॅगचा वास घेवुन तिथे बसुन भुंकून ईशारा दिला सदर बॅगेची पाहणी करता तिचेमध्ये गांजा मिळुन आला.<br><br>अशा प्रकारे नमुद गुन्हयातील तपासात ट्रॅव्हलींग बॅग मधुन १३.४४६ किलो गांजा जप्त करण्यात आला या कामात श्वान - लुसी व तिचे हस्तक यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |




अशा प्रकारे माहे **जून २०२४** मध्ये श्वान पथकामार्फत खून - ०२, घरफोडी - ०२ एन.डी.पी.एस. ॲक्ट - ०१ असे एकूण - ०५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.